२५३

वंदे मातरम्

शाहिरी......डफ

# पोवाडा ११ व १२ वा.

# बदामीचा वेढा
आणि
# मोतिलाल नेहरू

लेखकः—शाहीर प्रल्हादराय

आवृत्ती १ ली.

शके १८५७] किंमत एक आणा [सन १९३५

## दे. भ. श्री. न. चिं. केळकर यांचा

# अभिप्राय

राणी लक्ष्मीबाई, अफझलखान व बापू गोखले हे पोवाडे शाहीर प्रल्हादराय यांचे वाचले. भाषा जोरदार असून वर्णनें चांगलीं साधलीं आहेत. बहुजन समाजाला इतिहासाचे सोपे पाठ देण्याचें काम पूर्वी पोवाडे करीत असत. आजहि पोवाड्यांना तें काम करण्यास जवळजवळ तितकाच वाव आहे म्हटल्यास चिंता नाहीं. कारण सुशिक्षीतपणाचा आळ आलेलीं शहरासारखीं ठिकाणें सोडलीं तर बाकीच्या शेंकडा ९५ खेडयांत पूर्वींइतकेंच ज्ञान किंवा अज्ञान कायम आहे. आणि त्यांना करमणुकीच्या द्वारें आपुलकीनें शिक्षण देणारी शाहीरासारखी दुसरी संस्था क्वचितच असेल.

संशोधकांनी शोधलेली नवी माहिती सर्व गोळा करून ती जुन्या चालींत जुन्या भाषेंत व जुन्याढंगांत बसविणें हेंच कलेच्या व व्यवहारी उपयोगाच्या दृष्टीनेंहि उचित ठरेल. प्रल्हादरायाचे प्रयत्नहि याच दिशेचे असून बरेच यशस्वीहि झालेले आहेत.

पुणें ता० ७।३।१९३४. न. चिं. केळकर.

प्रकाशकः—प्रल्हाद रंगनाथ जामखेडकर, नाथनिवास जळगांव पू. खा.
मुद्रकः—शंकर रामचंद्र दाते, लोकसंग्रह छापखाना ६२४ सदाशिव पेठ, पुणें.

१५५

# चार शब्द

इतर पोवाड्यांप्रमाणें हे दोन नवीन पोवाडे चालू सालीं जनता-जनार्दनाचे सेवेस प्रेमानें सादर करीत आहें. त्याचाहि जनता प्रेमानें स्वीकार करून मला उपकृत करील अशी आशा आहे.

सदरचे पोवाड्यास ज्या ग्रंथाचा मीं आधार घेतला त्या ग्रन्थकाराचे आभार मानणें माझें कर्तव्य आहे. श्री. य. न. केळकर यांनीं मला भारत इतिहास संशोधक मंडळांतून माहिती मिळवून देऊन शिवाय पुढेंहि वेळोवेळीं इतिहासाची माहिती सुलभतेनें मिळावी म्हणून त्या मंडळाचे मला सभासद करून घेतलें आणि त्यांचे प्रसिद्ध झालेले मराठ्यांचे पोवाडे या पुस्तकाचाहि मला उपयोग झाला याबद्दल मी त्यांचा आभारी आहें.

सर्वांचा कृपाभिलाषि,

**शाहीर प्रल्हादराय**

## बदामीचा वेढा या पोवाडयांतील कथानक

इसवी सन १७८५ या सालांत पेशव्यांच्या आश्रयाखालील नरगुंद व कित्तुर हीं संस्थानें टिपूनें काबीज केलीं. पुणेंदरबारनें या कामीं मोहिमेची तयारी केली. याच सुमारास नागपुरकर भोसलेहि पुण्यास आले होते. या मोहिमेंत नाना जातीनें हजर होते. निजाम, परशुरामभाऊ हेहि होते. पेशव्यांची हुजूरात फौज हरिपंत तात्या व बाजीपंत आण्णा यांचे देखरेखीखालीं होती. शिवाय पटवर्धन, भोसले, होळकर, गणेशपंत बेहेरे, रास्ते व अक्कलकोटकर हेहि सरदार होते. मसलत पक्की करून बदामीचा पाडाव करण्यासाठीं मराठा सैन्यानें कूच केलें.

बळकटीविषयीं बदामीच्या किल्ल्याची प्रसिद्धी होती व टिपूनेंही सलोखा मोडून कर्नाटकांत धुमाकूळ उडवून दिला होता आणि त्याकरितांच वरील मोहिमेची जय्यत तयारी होती. टिपूनेंहि हैदरगुलाम यास सैन्याधिकारी नेमून त्याच्या हाताखालीं पायदळ, तोफा वगैरे युद्धसामुग्री मुबलक देऊन ठेविली होती.

मराठयांनीं अक्षय्यतृतीयेच्या मुहूर्तानें मोर्चेबंदी केली. मोर्चे रोज पुढें पुढें सरकत होते पण अशानें हेतु लौकर साध्य होणार नाहीं म्हणून व किल्लाहि हातीं येण्यास विलंब लागेल आणि टिपू तर ससैन्य श्रीरंगपट्टणाहून निघालेला असून तोहि इकडे येण्याचा संभव आहे. करितां तो येण्याचे आंत किल्ला काबीज करण्याचें ठरलें. त्याप्रमाणें ता. २० मे रोजीं पेशवे, मोंगल व भोसले यांनीं जोराचा एक हल्ला केला आणि त्याच दिवशीं किल्ला हस्तगत करून भगवा झेंडा फडकविला. या हल्ल्यांत ८०० जवान कामीं आला.

जय हिंदमाता

## शाहिरी . . . . . डफ

## पोवाडा ११ वा.

# बदामीचा वेढा

लेखक—शाहीर प्रल्हादराय

स्वातंत्र्य संगरी मर्दमराठा सहजच जातो समराला। स्वातंत्र्यास्तव मारी भरारी झेप न सहावे काळाला । तोच मराठा म्हणवून घेई नामधारी हे नांवाला ॥ धृ० ॥

## चौक १ ला.

बेलाग बदामी किल्ला। पेशवा खवळला। बोलवा पथकाला[१]। टिपुसुलतान घाली हैदोस । मस्ति जीरवून करा जमिनदोस्त। नाना भाऊ निघा इतर ते दोस्त ॥ चौघडा वाजे धडाधडा। फुंकी शिंगाडा। आणि रणगाडा। आरोळ्याच्या[२] गाड्या दाखल डेऱ्यास। कैक एकांडे[३] स्वार तैयार । दिलासा देऊन निघाले लढण्यास॥ फडणीस म्हणती भाऊस। व्हावे अघाडीस। बिनी राखण्यास। मोरच्यावर खबरदार तुम्ही खास। दमदमा रचून चढवा हल्ल्यास। मोंगल, भोसले द्यावे साहयास॥ चाल....ऐकाहो ऐका खबरेला। फडके, शिंद्यांनीं। आणि भोसल्यानीं। मोरचे बांधुनी हल्ला केला॥ चाल....बारावर बार तवा उडाला। धाडधाड आदळीय बुरूजाला। बुरूज दाद देईना गोळ्याला । नभोमंडळीं बिजली चमकती। शिखर ती गती। झटपट अती। मारा केला॥

टीप— १ पथकाला— सैन्याला. २ आरोळ्याच्या— तोफांच्या. ३ एकांडे स्वार— एकटा स्वार. हे निधड्या छातीचे शिलेदार बहुतेक सर्व जातींतून सामान्यत: असत.

## चौक २ रा.

नगरांत लोक कानडा । शिपाई फाकडा । हातीं जमदाडा । गुलाम हैदर राखी किल्ल्यास । पंचविस हजार फौज थाटास । महजरा[1] पडला मराठ्यांचा त्यास ॥ अच्याट किल्याचें बळ । नजीक तो तळ । रणमंडळ बुजाऊन कडक बिजलीचा मार । जंबुरांतुन[2] । आग्न वरसे बरसात । मुजऱ्याची[3] दखल नाहीं मराठ्यास ॥ खोदिता सुरुंग फडफडा । उडती भडभडा । पडेना खडा । किल्ला दाद देईना सुरुंगास । हवालदिल होऊनी भाऊ चित्तास । परतला राती तसाच गोटास ॥ चाल....नानाभाऊन सल्ला केला । पहाटेच्या प्रहरीं । दीन शनवारी । करून तैयारी । मोकळा झाला ॥ चाल.... भाऊनें घोडा घेतला पहा अघाडीस ॥ त्याचे मागुन गारदी निघाले तेव्हां बिनीस ॥ हरीपंत फडक्यांची फौज आली जोरास ॥ घोड्या मोंगल मुधोजी भोसला चालला स्वारीस ॥ शाईती चिमण रायाची हल्लीं धडाक्यास ॥ चाल. . . .घाटगा चालला तै कोरेला[4] । भिडना शत्रु एकमेकाला । भडकले सरदार क्रोधाला । भुभुक्कार[5] गर्जले जागेला । गर्जूनी त्यांनीं हल्ला केला ॥ रेवणीच्या नजिक मारा केला । शत्रु पक्षानी । दारू ठासुनी । ठेवली पुरुनी भडका केला ॥ सातशे जवान कामी आला । चेव मंग आलाय मराठ्याला । नेसाचार मारा त्यांनीं केला ॥

## चौक ३ रा

भगवा झेंडा डौलानें चाले । फडफड हाले । हालूनिया बोले । विजयीच व्हाल तुम्ही हमखास । शहर हें आलें बघा ताब्यांत । चलाचला निघा शिरा किल्यांत ॥ हरीपंत बोले भाऊला । रणरंगाला । धरा नेटाला । नगरांत शिरून करा सर्व ठार । शिल्लक नका ठेवू एक शिलेदार । चेपा किल्यांत सर्व दुस्मान ॥ सैनिक झाले तै ठार ।

---

टीप--१महजरा–वेढा. २ जंबुरांतुन–तोफेंतून. ३ मुजऱ्याची–मान्याची जागा. ४ कोरेला–बाजूला. ५ भुभुक्कार–जयजयकार.

१५२



मैदानावर कितिक मातबर[१] । शौर्यानें आले तेथें कामास । रंजुक[२] झडली त्याच समयास । तुडवणी[३] केली ठायाठायास ॥ चाल.... ऐन दोहोपाहाराऱ्या हे वेळेला। पटवर्धनान। शिडऱ्या लावून । खालून चढून । यत्न केला ॥ फुकट गेला तेथें तो वाऱ्याला ॥ तो सेनानी खिन्न होऊन । बोले त्वेषान । शत्रू कापून । किल्ला घेईन । आज हाताला ॥ लइच जोराचा नेट धरला । चोहि बाजुन मारा केला ॥ घोडयाशी तंग । उडविती रंग । रणातची दंग । सारा झाला । चाल....मर्द मराठयांचा झेंडा हलला । चाललाय भाऊ आघाडिला। शिडीवर पाय त्यान दिधला। डुक्कर खळि आलिया नेटाला। किल्ला भेसूर दिसों लागला । येकच लागल ध्येन त्येला। घेऊनच किल्ला हो हाताला। निशाण लाऊ आम्हीच बुरुजाला। यवन सारा मिळवून मातीला । मंगच आम्ही जाऊंर पुण्याला । फिरंगाचा[४] । मारा लइच केला । रणभेऱ्यांचा गजर झाला। त्यांत तोफांचा सूर मिळाला। बाइस उमराव तुटून पडला । कटक तीन लाखच मदतीला । शिंदे होळकर चिडून गेला। तटावर फेकितो भाल्याला। फडकेहि भरवितीं धडकीला । भोसलाहि आलाया जोराला । तुडवित तुडवित शत्रूला । धारकरी[५] फुलाया लढण्याला। घेमार झालिया कोटाला ॥ भाऊ भिडतांच शत्रु लपला। निशाण लाविलें। शौर्य दाविलें। विजयी जाहलें। गातो पोवाडा॥ ( मिळवणी ) पेशव्यास गेली खबर । नऊशे स्वार । जाहला ठार । बदामी गड आला हातास पत्ता नाहीं हैदाराचा किल्ल्यास। प्रल्हाद शाहिराचा हा अनुप्रास ॥

समाप्त

---

टीप—१ मातबर–मोठे सरदार. २ रंजुक–तोफांचा जबरदस्त मारा. ३ तुडवणी–लुटालुट. ४ फिरंगाचा–एक प्रकारचें तरवारीसारखें हत्यार. ५ धारकरी–पट्टा व तरवारीनें लढणारें सैन्य.

२६७

जय हिंद्माता

## शाहिरी . . . . डफ

## पोवाडा १२ वा.

# मोतीलाल नेहरू

लेखकः—शाहीर प्रल्हादराय

घात कसा झाला मोतीलाल गेला ॥धृ०॥ मातृभूमीच्या कंठांतील हा अलंकार तुटला। ऐन प्रसंगीं त्या काळानें घात कसा केला ॥१॥ राजविलासी तनु ही ज्याची भोगुनी भोगाला। देशासाठीं फकीर होऊन भोगी बंदीशाला ॥२॥ मार्गदर्शक होऊनी आम्हा चालवी युद्धाला। मुहूर्त मेढ ती रोवून त्यानें अर्पिलें धामाला ॥३॥ समरधीर आणि मुत्सद्दी तो सेनानी झाला। गीता रचिता स्वातंत्र्याची दिपवी जगताला॥४॥ वीर नेहरूच्या पांडित्यानें शत्रु गडबडला। कळलें परी तें वळलें नाहीं उपाय नच खुटला ॥५॥ पंडीतजीच्या बुद्धीप्रभावें गांधीजी दिपला। गांधीजीच्या तपोबलाचा दाब पंडीताला ॥६॥ स्वकियांचा तो जोम वाढवून राखी सत्वाला। राजयंत्राचे काढी वाभाडे मिळवून विजयाला ॥७॥ द्रव्य सुखाचा मोह कठीण हा नच भाळे त्याला। तुकोबांचें तें तत्त्व आचरिलें वैरागी बनला ॥८॥ निर्वाणीचा समय पातला हिंदी राष्ट्राला। स्वातंत्र्याचा लढा चालवून शरपंजरी पडला ॥९॥ सहकारास्तव मुख्य प्रधानें हस्त पुढें केला। ऐशा समई योग्यची सूचना दिधली देशाला ॥१०॥ परी सर्वची अशा संपली बोल खोलची गेला। काळानेंही वेळ साधली हिराच उचलीला ॥११॥ मानव रत्नें मातृकुक्षिला येती जन्माला। खराखोटयाचा निर्णय करितां मोतीलाल ठरला ॥१२॥ जवाहीर सम दीप तुझ्या ये वंशी जन्माला। राष्ट्र रथाची अवघड दुस्सर घेई खांद्याला ॥१३॥ तव डोळा हें सर्व पाहिलें शमला तापाला। पुत्र रत्न हे चिरायु लाभो आमुच्या देशाला ॥१४॥ शाहीर हा प्रल्हाद करोनो ऐशा कवनाला। विनंति त्याची प्रभुचरणाला रक्षी नेहरूला ॥१५॥

**समाप्त.**